<u>नियमित दिवाणी दावा क्र. १७६/२०१४ मध्ये निशाणी ७० खालील आदेश</u>

**(MHST070008602014)**

कृष्णा विष्णू जगदाळे व इतर --- वादी

वि.

रूपाली विकास यादव व इतर --- प्रतिवादी

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.२७ वर पारीत झालेला "पुरावा रद्द" चा आदेश रद्द होवून प्रतिवादीला पुरावा देण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले.

२. प्रतिवादी क्र. ३ यांनी कथन आहे की, सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.३ यांचा उलटतपास घेणेकरीता प्रलंबित आहे. परंतु, प्रतिवादी क्र. ३ यांचे पती हृदय विकाराने आजारी असल्यामुळे त्यांचे देखभाल करणेसाठी व धार्मिक कार्यक्रम असलेमुळे प्रतिवादी क्र. ३ न्यायालयात उपस्थित राहू शकली नाही. त्यामुळे दि.१५/०४/२०२५ रोजी नि.१ वर "पुरावा रद्द" चा आदेश पारीत करण्यात आला. परंतु, प्रतिवादीला पुरावा देणेचा आहे. सबब, त्यांनी "पुरावा रद्द" चा झालेला आदेश रद्द होवून मिळण्याची विनंती केली.

३. सदर अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांना ब-या वेळा संधी देवून देखील प्रतिवादी क्र. ३ न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत. प्रतिवादीने दिलेल्या कारणाचा कोणताहा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे

अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादी क्र. ३ यांना पुरावा देणेकरीता पुरेशी संधी दिली दिलेली होती. परंतु, प्रतिवादी क्र. ३ उलटतपसासाठी वेळोवेळी संधी देवून देखील न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे त्यांचेविरुध्द "पुरावा बंद" चा आदेश पारीत करणेत आला. परंतु प्रतिवादी क्र. ३ यांना त्यांची बाजू मांडण्याची व त्या अनुषंगाने संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे योग्य व न्याय्य आहे. तसेच अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, प्रतिवादीचे दिरंगाईमुळे वादीस झालेला त्रास लक्षात घेता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी ७०) रुपये ३००/- (अक्षरी रक्कम रुपये तीनशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. ३ ने वादीस खर्च रुपये ३००/- दिल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ चा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.01.17 17:45:25 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. १३/०१/२०२६. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.

ता.कराड, जि.सातारा.